# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कृषी क्षेत्रातील योगदान

**प्रा. डॉ. विद्यासागर पुंडलिक सोनकांबळे**
सहयोगी प्राध्यापक तथा संशोधक मार्गदर्शक
इतिहास विभाग, मोरेश्वर महाविद्यालय भोकरदन जि. जालना
मो. ९४२३४६०५७० , Email ID – siddhant0570@gmail.com

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कृषी विषयक कार्य व विचार देशाला आर्थिक दृष्ट्या मजबूत करणारे होते ते महान अर्थशास्त्री होते. शेतीला जोड औद्योगिकरणाची असली पाहिजे ही त्यांची भूमिका होती. शेती मालाची संबंधित प्रक्रिया करणारे कारखाने निर्माण झाल्यास शेतकरी व शेतीवर उपजिवीका करणारे शेतमजूर यांची परिस्थिती सुधारेल अशी त्यांची भूमिका होती भारताचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी हे करणे आवश्यक आहे असे त्यांचे मत होते.

"स्वतंत्र भारतात ग्रामजिवणाचा स्तर उंचावण्यासाठी शासन जे प्रयत्न करेल त्याचा पाया सामाजिक न्याय हाच असला पाहिजे म्हणून औद्योगिकीकरण व शेती याचे अतूट नाते असले पाहिजे शेतीमालावर प्रक्रिया करणारे उद्योग शेतकर्यांच्या शेतमालाच्या लाभासाठी निर्माण करणे आवश्यक आहे विकास कार्यक्रमातून मिळणार्या लामांची न्याय तत्वावर समान वाटणी आणि आजवर जे वचिंत म्हणून जगत आले आहेत त्याना अग्रहक देण्याची गरज आहे"१ हाच विचार बाबासाहेबांनी वारंवार सागींतल आहे भारतात सरंजामदार, जमिनदाराचा मोठा वर्ग असल्याने जो वचिंत घटक होता हा पुर्णतः शेतमजुरीवर विसबुंन राहिला परिणामतः निसर्ग लहरी नुसार शेतीचे नुकसान झाल्यास किंवा एखाद्या पिकाचे भरमसाठ उत्पादन झाल्यास व त्यास योग मोबदला मिळाल्यास त्याचा परिणाम शेतमजूरावर पडत असे परिणामतः त्याच्यावर उपासमारीची वेळ यत असे म्हणुन बाबासाहेब शेतमालाला उद्योगास जोडण्यासाठी सांगतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यसमाजवादाची जी संकल्पना माडली या मध्ये भावी राज्यघटनेत शेती विषयी सुधारणा मांडल्या होत्या त्यात शेती व्यवसाय कशा प्रकारे करावा या विषयी जे मुद्दे सुचवले होते ते पुढील प्रमाणे. "शेती सामुदायिक शेती म्हणून कसली जाईल, शेती शासनाने केलेल्या नियम आणि मार्गदर्शक तत्वाप्रमाण कसली जाईल, शेती उत्पन्नातून ठेवी वसुल राहिल्यानंतर उत्पन्नात कुळांना नियमा प्रमाणे आपापला वाटा मिळेल. शेती कसण्यासाठी ग्रामीण शेतकर्यांना देताना जातीपातीचा विचार केला जाणार नाही त्यामुळे कुणी जमीनदार असणार नाही अथवा कुळ किंवा भूमिहीन मजुरही असणार नाही"२ बाबासाहेब भारतातील जमीनदार व संरमदाराकडे ज्या जमीनी आहेत त्या सामुदायिक शेतकर्यांचा गट निर्माण करुन त्यांच्याकडे त्या सोपवाव्यात असे सुचवितात व या जमीनी

देते. वेळी जातीचा विचार न करता कसण्यासाठी द्याव्यात जेणे करून उत्पन्न वाढेल व आर्थिक विकास दर वाढेल असा आशावाद बाबासाहेबांनी बाळगला होता.

"जमीन करण्याच्या दृष्टीने विचार करता जमीनदारी असमर्थनीय होत चालली होती ती रद्द करावी यावर त्यांनी भर दिलेला होता जमीनदारीचे उच्चाटन झाल्यानंतर व्यक्तिगत शेतकरी हा मालक न राहता सरकार जमीनीचे मालक बनले पाहिजे यावर त्यांनी भर दिलेला होता "३भारतामध्ये ज्या जमीनदाराकडे शेती असायची त्या शेतावरच शेतमजूर ाची उपजीविका चाले परिणामतः नैसर्गिक आपत्ती मुळे पिकाचे नुकसान होई अशा वेळी शेतमालक शेतमजुरांना मोबदला देत नसत. जर थोड का होईना जमीनीच्या भागाचे हे मजूर मालक असले तर शेती करणारे कष्टाळू बनणार होते यामुळे अधिक उत्पन्न काढून स्वतः बरोबर राष्ट्रीय वाढीत ही ते सहभागी होणार होते म्हणून बाबासाहेब जमीनदारी पध्दतीचे उच्चाटन करुन भूमिहीन शेतकर्यांना त्या शेताचे मालक करण्याविषयी सुचवितात. "लोकशाही ची बुज राखणार्या समाजवादी चोकटीतील सामुदायिक शेती. त्याना अपेक्षित होती ज्यात. जमीनीतील खाजगी हक्काचे अधिग्रहण, योग्य आकाराचे प्रक्षेत्रे निर्माण करुन काही कुटुंब मिळुन बनवलेल्या ग्रामीण कुळामध्ये धाटणीची शासनाची जबाबदारी, प्रत्येक कुटुंबातील सदस्यांना लागवडीखालील जमीन आणण्याचा मौलिक हक्क सामुदायिक शेती पध्दतीने जमीन नैसर्गिक साधन सामाजिक मालकीचे असल्याने प्रातिनिधिक शासनाला प्राप्त होणारे हक्क अपेक्षित होते."४ मात्र भारतामध्ये ही कल्पना प्रत्येक्षात अमलात येऊ शकली नाही कारण भारत देश अनेक संस्थानिकामध्ये विभागला होता तसेच शेती ही. जमीनदार वर्गाकडे एकवटली असल्याने ही सुचना अमलात येऊ शकली नाही.

बाबासाहेब धोरण समितीचे अध्यक्ष होते त्या वेळी त्यांनी आपले मत मांडले "शेती हा आजचा मुख्य विषय आहे व तो दिर्घकाळ चालु राहणार आहे शेतीचे उत्पन्न वाढवण्यासाठी शेती फायदेशीर होणे आवश्यक आहे शेती फायदेशीर बनवण्यासाठी शेती वरील लोकसंख्येचा भार कमी करुन भांडवली गुंतवणूक वाढविणे आवश्यक आहे शेती वरील लोकसंख्येचा भार कमी करण्यासाठी व शेती फायदेशीर करण्यासाठी देशातील उद्योंगाचा सर्वांगीण विकास करणे. महत्त्वाचे आहे वाढत्या औद्योगिकरणामधुनच शेती व उद्योगाचा समतोल विकास होईल शेती वरील लोकसंख्येचा भार कमी झाल्यामुळे जमीनीचा आकार वाढेल त्यातून दरडोई उत्पन्न वाढेल"५ बाबासाहेबानी भारताचा विचार करता संपूर्ण समाज शेतीवर उपजिवीका करित होता हे चित्र पाहिले होते आणि वाढती लोकसंख्या लक्षात घेता शेती त्याना जगण्याचा पुर्णतः आधार राहणार नव्हती म्हणून शेतीला उद्योगाची जोड देण्यावर त्याचा भर. होता. शेतीतुन उत्पादीत मालावर जर प्रक्रिया केली तर शेतकर्यांना फायदाच होईल व उत्पन्नात वाढ होईल लोकसंख्ये सारख्या समस्यांना सामोरे जाता येईल हीच बाबासाहेबाची भुमिका. होती.

शेती विकासाला आड येणार्या खोती पध्दतीवर बाबासाहेबांनी प्रहार केला होता. ही पद्धत शेतकरी शेतमजुरांची कशी पिळवणूक. करते हे सांगितले होते त्याच प्रमाणे शेतकर्यांच्या प्रश्नावर मुंबई विधिमंडळावर बाबासाहेबांच्या नेतृत्वाखाली आंदोलन झाले जे शिष्टमंडळ मुख्यमंत्र्यांना भेटले त्यात " पहिली मागणी ठेवली ती शेतावर काम करणाऱ्या मजुरीचे किमान वेतन ठरविण्या विषयी महसूल करात ज्या प्रमाणे सुट देण्यात आली होती त्याच प्रमाणे थकलेल्या भाड्याच्या पैशातून सुट द्यावी दुसरी मागणी अशी होती की मालकाला भरपाई दिल्या शिवाय किंवा देऊन ईनामदारी व खोती या पध्दती नष्ट करण्या बाबत ताबडतोब कायदा करावा. सामाजिक दृष्टया आर्थिक दृष्ट्या कुचकामी ठरलेली जमीनदारी संपुष्टात आणली. पाहिजे लहान शेतकर्यांचे पाण्याचे दर कमी करावेत"६ अशा प्रकारची बाबासाहेबांनी केली होती या मध्ये कसणार्यास जमीनीचा हक्क मिळावा व जे अल्पभूधारक शेतकरी असतील त्याना सवलत द्यावी व कृषी विकासाला आड येणार्या व कष्टकर्यांची पिळवणूक करणार्या खोती पध्दतीचा बिमोड करून शेती विकासाला चालना द्यावी यावर बाबासाहेबांनी भर दिलेला होता.

बाबासाहेबानी शेतीतून मिळणार्या उत्पन्नावर शेती कर लावावा अशी सूचना केली होती "सरकारी शेतसार्याचे प्रमाण शेतीच्या उत्पन्नाच्या मानाने जास्त होते व त्यामुळे शेतकर् यावर हलाखीची स्थिती उद्भवते उत्पन्न कमी झाले तरी शेतसारा भरावा लागतो यावर चर्चा चालू होती त्या काळात शेतसारा कशावर बसवावा यावर त्यांनी मंथन केले "७ अतिवृष्टी किंवा अनावृष्टिमुळे शेतीचे नुकसान होत असे अशा वेळी शासनाने जे कर ठरवुन दिले होते त्यामुळे शेतकर्यांना ऐपत नसताना शेतीचे नुकसान होऊनही कर द्यावा लागत असे म्हणुन बाबासाहेब दरवर्षीच्या परीस्थिती नुसारच कर लावण्याची. सुचना करतात.

त्याच बरोबर बाबासाहेबांनी जमीनदार खोता विरुद्धही आंदोलन चालवून शेतकर्यांना त्यांच्या जाचातून मुक्त होण्यासाठी एकत्र येण्याविषयी आव्हानही केले. कोकणातील खोत शेतमजूराची जी पिळवणूक करीत अशाना बाबासाहेबांनी सांगितले " खोतीच्या जाचातून ज्याना मुक्तता मिळवायची असेल त्यानी स्थलांतर करावे त्यांच्यासाठी एखाद्या दूरच्या सस्थांनात लागवडी करीता आपण जमीन मिळवून देण्याचा प्रयत्न करू"८कोकणातील खोतानी. शेतकर्यांना. पिळवुन टाकले होते शेती करावयास घेणार्या शेतकर्यांस जी रख्म ठरवित मात्र नापिकी झाल्यास किंवा कमी उत्पन्न निघाल्यास खोत या गोष्टीचा विचार न करता मनमानी करून शेतकर्यांकडुन पैसा, धान्य वसुल करीत असे परिणामतः ज्या शेतकर्यांनी वर्षभर कष्ट करून जे थोडेफार उत्पन्न काढले ते सुध्दा त्याच्या पदरी पडत नसे हे विदारक चित्र बाबासाहेबांनी पाहिले होते त्यामुळे ते शेतकर्यांना स्थलांतर करण्या विषयी. सल्ला देतात या खोती पध्दती विरोधात बाबासाहेबांनी आंदोलने केली, मुंबई विधीमंडळात आवाज उठविला यामुळे अनेक खोतानी बाबासाहेबांना धमकावले होते परंतु न डगमगता हा. लढा चालू ठेवला व त्याचा परिणाम खोती पध्दती

कायद्याने बंद करण्यात आली आहे हे फार मोठे कार्य बाबासाहेबांनी कोकणातील शेतकर्यांसाठी केले आहे. भारतातील आर्थिक चक्र पुर्णतः शेतीशी निगडित आहे म्हणून बाबासाहेबांनी शेती आधुनिक पद्धतीने करण्यावर भर देतात उत्पादका वाढवण्यासाठी जमीन विषयक सुधारणा मध्ये जमीनदारांनी पध्दतीचा शेवट, शेती कसणार्याच्या. नावे जमीनीची मालकी करणे हा विचार बाबासाहेबांनी पुढे रेटला परिणामतः अनेक शेतकर्याना जो कुळ कायदा अस्तित्वात आला त्याचा फायदा झाला याचे सर्व श्रेय बाबासाहेबांना जाते.

**सारांश**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आर्थिक विचारावर प्रंचड अभ्यास केलेला होता त्यामुळे कृषीप्रधान भारताचा विकास करण्यासाठी जात-धर्म याला थारा न देता आर्थिक बाबतीत समता प्रस्थापित होणे गरजेचे आहे हे प्रतिपादिले भारतीय समाज हा शेतीवर अवलंबून आहे आणि लोकसंख्या जसजशी वाढेल त्याप्रमाणात शेतीवर अवलंबून असणार्याचे प्रमाण वाढेल व शेतीचे तुकडे होतील म्हणून बाबासाहेबांनी शेतीमालाला उद्योगाची जोड देण्यासाठी सांगितले. शेती उत्पनाच्या वाढीसाठी शेती आधुनिक तंत्रज्ञानाने करण्याविषयी बाबासाहेब सांगितात. तसेच जी खोती पध्दत जमीनदारी पध्दत अस्तित्वात होती ती नष्ट करून कसणार्याना कायमची देण्यात यावी. असे केल्याने भारत हा शेती विकासात प्रगतीपथावर जाइल व भविष्यात येणार्या संकटाला तोंड देण्यास समर्थ. राहील हा आशावाद बाबासाहेबांनी बाळगला होता. त्यानी शेतकरी व शेतमजूरा विषयी मांडलेले विचार आजही आपणास फायद्याचे ठरत आहे.

**संदर्भ**

१) लोकराज्य- आक्टोबर-२००६- माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई पृ. १४३
२) डॉ. खरे विजय- डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि राष्ट्रीय चळवळ. ( प. आ. २०१०) सुगाव प्रकाशन पुणे-पृ.१४१
३) मार्डिकर मदन- आधुनिक भारताच्या इतिहास( प. आ. २००२) कैलास पब्लिकेशन औरंगाबाद पृ. १०७
४) पानतावणे गंगाधर- पत्रकार डॉ बाबासाहेब आंबेडकर ( प. आ. १९८७) प्रतिमा प्रकाशन पुणे पृ. २२३
५) थोरात सुखदेव- बाबासाहेब आंबेडकर जल नियोजन व विद्‌युत विकास भुमिका व योगदान ( प. आ. २००५) सुगाव प्रकाशन पुणे पृ. ३५
६) कीर धनंजय- डॉ बाबासाहेब आंबेडकर ( स. आ. १९८९) पॉप्युलर. प्रकाशन मुंबई, पृ. ३११
७) पानतावणे गंगाधर- पत्रकार डॉ बाबासाहेब आंबेडकर- कित्ता, पृ. २२१
८) कीर धनंजय- डॉ बाबासाहेब आंबेडकर – कित्ता. पृ. १३७